**विधान सभा पावसाळी अधिवेशन २०२१**
**दिनांक ५ जुलै ते ६ जुलै २०२१**
**सत्र कालावधीतील कामकाजाचा आढावा**

**उपाध्यक्ष :** कोविड १९ साथीच्या पार्श्वभूमीवर सन २०२१ मधील पावसाळी अधिवेशन दिनांक ५ जुलै ते ६ जुलै २०२१ या कालावधीत मुंबई येथे घेण्यात आले. पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवसाचे कामकाज संपलेले आहे. मी या सत्र काळातील कामकाजाचा आढावा सदनासमोर ठेवतो :-

| | | |
|---|---|---|
| एकूण बैठकींची संख्या | : | २ |
| प्रत्यक्षात झालेले कामकाज | : | १० तास १० मिनिटे |
| अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ | : | १ तास २५ मिनिटे |
| रोजचे सरासरी कामकाज | : | ५ तास १० मिनिटे |

**शासकीय विधेयके** :

विधान सभा विधेयक : पुरस्थापित : १२

संमत करण्यात आलेली विधेयके : ९

लोकाभिप्राय अजमाविण्याकरिता परिसृत : ३

विधान परिषद विधेयक : संमत करण्यात आलेली विधेयके : **निरंक**

..२

**नियम ४७ अन्वये निवेदन : २**

**शासकीय ठराव : ४**

**शोक प्रस्ताव व पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली.**

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, विधान मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा विभागाचे अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मनापासून आभार मानतो. तसेच मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी, कोरोना चाचणीशी निगडित आरोग्य सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी या बरोबरच प्रसिद्धी माध्यमांचे प्रतिनिधी यांचे देखील आभार मानतो.

..........